भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/०१/२०१८

**१) संगनमत करून तोंडा– तोंडी भांडण करून लाथ मारल्याने बेंचवर पडुन दुखापत केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २२/०१/२०१८ चे २०.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी सुरेश यांचे दुकाना समोर बसले असता आरोपी क्र. १ ने फिर्यादी कडे जाऊन आपल्या घरचे गोष्टी सांगता असता फिर्यादीस तु आपल्या मुला मुलीचे लग्न कसा करतोस ते पाहतो, असे म्हणुन दोघांत तोंडा –तोंडी भांडण होत असतांना आरोपीने संगनमत करुन आरोपी क्र. २ नी फिर्यादीचे मागेहुन येवुन फिर्यादीला लाथ मारुन समोर असलेल्या लोखंडी बेंचवर पडल्याने कपाडावर दुखापत झाली. फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. आत्राम पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलची चोरी. :–**

दिनांक २२/०१/२०१८ ते २३/०१/ २०१८ चे २३.३० ते ०६.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी प्रमोद यशवंत बोरकर वय ३८ वर्ष, रा. पाथरी यांचे अंगनात ठेवलेली होंडा कंपनीची सिबी साईन काळया रंगाची लाल पट्टा असलेली एमएच ३६ टी २६४७ किंमती ३५,०००/–रु. ची मोटार सायकल ही कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) चारचाकी वाहनाला ट्रकने धडक देवुन ४ जखमी . :–**

दिनांक २३/०१/२०१८ चे २३.४५ वाजता. दरम्यान यातील फिर्यादी रमेश रामकुमार लींगायत वय २४ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड वरठी हा त्याचे चार चाकी वाहन क्र. एमएच ३६ एच ७८७३ ने भंडारा वरून वरठी येथे पोहचुन पाचगाव फाटयाजवळ आंबेडकर वार्डातुन घरी जाण्याकरीता उजवीकडे वळले असता समोरून येणा–या यातील आरोपी ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे, भरधाव वेगाने चालवुन फिर्यादीचे चारचाकी वाहनाला पाचगांव फाटा येथे धडक दिल्याने फिर्यादी व इतर ३ लोकांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने, फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,३३७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. उके पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**४) ट्रकच्या धडकेत एकाचा मृत्यु. :–**

दिनांक २३/०१/२०१८ चे १८.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी शिवदास जयराम शहारे वय ६५ वर्ष रा. दाभा याची पत्नी मृतक सौ. पंचफुला शिवदास शहारे वय ६२ वर्ष हे खमाटा येथुन टिव्हीएस ३६ डीसी १०२७ ने दाभा येथे घरी जात असता, यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकलला धडक मारून मृतक सौ. पंचफुला हीचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. उईके पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

५) संगनमत करून काठीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद. :—

दिनांक २३/०१/२०१८ चे १९.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी घनशाम रामरालाल फुलबांधे वय ४० वर्ष रा. मांडवी याने घरा समोरील नालीवर काडया ठेवल्याचे कारणा वरून यातील आरोपीतांनी संगनमत करून आरोपी क्र. २ ने फिर्यादीचे नाकावर, कपाळावर बुक्यांनी मारपीट केली व सुबाभळीचे काठीने डाव्यापायाचे मांडीवर मारून जखमी करून मारण्यापी—पीटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

६) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :—

दिनांक २३/०१/२०१८ चे १९.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी ही व्यसनमुक्ती सदस्या सोबत आरोपी हा दारू विक्री करीत असल्याने घरासमोरील रोडवर ऊभे असतांना यातील आरोपी हा त्याचे जवळ धावत गेला व व्यसनमुक्ती समिती महिला सोबत असलेला इसम यास तु बाया सोबत असलेल्या महीलांनी माझी दारु कशी बंद करता असे बोलुन सार्वजनीक ठिकाणी अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन धमकी दिल्याने ओ. पी. गोंडउमरी आकरन्स क्र. ००/१८वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चांदेवार पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

७) इसमाचा मृत्यु. :—

दिनांक २३/०१/२०१८ चे १२.३० ते १२.४० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी व मृतक अनिल सेवकराम नितनवरे वय ५३ वर्ष, रा. भंडारा ह.मु. एमबी पटेल कॉलेज साकोली, प्राध्यापक हे वर्ग घेवुन प्राध्यापक रूमचे पोर्च मध्ये आले व मृतक हे खुर्चीवर नमुद ता वेळी बसले असता त्याचा घोरण्याचा जोरात आवाज आल्याने फिर्यादी यांनी त्यांना प्रकृती बाबत विचारले असता, त्यांनी प्रतिसाद न दिल्याने फिर्यादीने स्टॉप रूममधील प्राध्यापक व परीचर यांनी मृतक याला चार चाकी वाहनाने डॉ. अग्रवाल कडे नेले असता, त्यांनी गाडीतच तपासुन शासकीय दवाखाण्यात नेण्यास सांगितले वरून मृतक यांना शासकीय दवाखाना साकोली येथे नेले आता तेथील वैद्यकिय अधिकारी यांनी तपासुन मरण पावल्याचे सांगितल्याने डॉ. मेमो व फिर्यादी प्राध्यापक राजेश रमेश दिपटे वय ४४ वर्ष रा. इंदिरा नगर तुमसर ह.मु. एमबी पटेल कॉलेज साकोली यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. रेवतकर पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

८) अवैध दारु अड्डयांवर धाडी . :—

दिनांक २३/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन पवनी व भंडारा येथे अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०१ मिली लिटर देशी दारू किंमती ५५०/—रु, तसेच जुगारातुन किंमती २०२/—रु. असा एकुण किंमती ७५२/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २३/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी– १०, तीन सिटर वाहनांवरती– १४ केसेस व ईतर वाहनांवरती – ७३ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनी. प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.